नि.दिवाणी मु.क्र. ९८/२०२१
गिताबाई वि. रामकृष्ण
नि.क्र. ३८ खाली.

**<u>साक्षीदारचा सरतपास प्रतिवादी तर्फे ॲड. श्री. आर.डी. वासनकर यांचेमार्फतः–</u>**

माझे प्रतिज्ञापत्रातील मजकुर खरा व बरोबर असुन मी त्यावर वाचुन व समजुन सही केली ते नि.क्र. ३८ वर आहे.

**<u>साक्षीदारचा उलटतपास वादीतर्फे ॲड. श्री. ए. बी. कडु यांचेमार्फतः–</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, वादी गिताबाई नांदणे ही माझी बहिण आहे. हे म्हणणे खरे आहे की, मौजे सर्फाबाद येथील गट क्र. ५१ व मौजा हिरुळ येथील गट क्र. ३८३ ही मिळकत फकीरजी यांचे नावावर त्यांचे हयातीत होती. हे म्हणणे खरे नाही, फकीरजी हे एकटेच त्या शेतीची वाहेपेरी करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी त्यांचे हयातीत त्या शेतीची विल्हेवाट लावलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे मृत्युनंतर सदरची शेती वादी व प्रतिवादी यांचे नांवावर झाली. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमधील त्यांचा हक्क माझे बहिणींनी सोडला नव्हता.

३. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहिण गिताबाई हिचे पती मयत असल्याने तिने दावा मिळकतीत तिचा हिस्सा मागीतला होता. हे म्हणणे खरे आहे की, गिताबाई हिने दावा दाखल करणेपुर्वी वकीलामार्फत मला वाटणी मिळणेसाठी नोटीस पाठविली होती.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझी बहिण प्रतिवादी क्र. ३ शशीकला ही माझेकडे राहते. हे म्हणणे खरे आहे की, मौजे सर्फाबाद येथील गट क्र. ५१ मध्ये तिचे नांवे ८५आर जमीन होती. हे म्हणणे खरे आहे की, तिने सदरची शेती बक्षीसपत्राद्वारे माझे मुलाचे नांवे करुन दिली आहे. मला एक मुलगा व चार मुली आहेत. माझे मुलाचे वय सध्या २८ वर्षे आहे. माझा मुलाचे नांव चेतन

आहे. हे म्हणणे खरे आहे की माझे मुलाचे नांवे मौजे हिरुळ, गट क्र. ३८१ मध्ये ७३आर , गट क्र. ३८२ मध्ये ७८आर व गट क्र. ३८४ मध्ये ८६ आर जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की सदरची शेत जमीन मीच त्याला दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, संपुर्ण वाद शेती माझे ताब्यात आहे व त्यापासुन मिळणारे उत्पन्न मी एकटाच घेतो.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे प्रतिज्ञापत्रात, माझी आई मनाबाई हिचे केलेले मृत्युपत्र जुन्या लोखंडी पेटीमध्ये सापडल्याचे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मृत्युपत्रानुसार मनाबाई हिने तिचे हिस्याची जमीन मला देण्याचे नमुद केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वाद शेती स्वत:चे कमाईतुन घेतल्याचे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे बहिणींचे/प्रतिवादींचे लग्न माझे वडीलांचे हयातीत झाले आहे. माझे वडील सात वर्षापुर्वी मयत झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांचे मृत्युनंतर माझे गिताबाईकडे जाणे–येणे बंद होते. हे म्हणणे खरे नाही की, गिताबाई हिला घर खरेदी करण्याकरीता मी आर्थीक मदत केल्याचे प्रतिज्ञापत्रात खोटे नमुद केले आहे. गट क्र. ३८३ व ५१ हे स्वत:चे कमाईतुन खरेदी केल्याबाबतचे कागदपत्रे मी अभिलेखावर दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, गिताबाई यांना त्यांचे हयातीत व मृत्युनंतर काही जमीन नव्हती.

६. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई मनाबाई यांनी कोणत्याही प्रकारचा मृत्युलेख लिहीला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मृत्युलेख मी बेकायदेशीर तयार केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मनाबाई ही तिच्या मृत्युपर्यत माझेकडेच राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२१ साली माझे आईला चालता–फिरता येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तिला लिहीता–वाचता येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे तिने मृत्युपत्राचा लेख लिहीला नव्हता. हे म्हणणे खरे

नाही की, माझी आई मरण पावल्यानंतर मी खोटे मृत्युपत्र तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र तयार करुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास– नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

माझे समक्ष,

दि. १२.११.२०२४

**(जी.एम.नदाफ)**
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
चांदुर बाजार.